लोकमत



फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या वतीने वारीमार्गावर कायमस्वरुपी निवाऱ्याची सोय.

# वारकऱ्यांसाठी कायमस्वरुपी निवारा

## फिनोलेक्स उद्योग समूह व माधव मुकुल फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** ज्ञानोबा-तुकोबांच्या गजरात पालख्या पंढरपूरच्या दिशेने निघाल्या असून, लाखो वारकऱ्यांचा मेळा आळंदी आणि देहूतून पंढरीच्या वाटेवर चालत आहे. या वारकऱ्यांना पायी वारी दरम्यान उन्हा-पावसात निवारा मिळावा म्हणून फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या वतीने वारीमार्गावर तीन कायमस्वरुपी शेड्स उभारले आहेत. यासोबतच इतर सामाजिक उपक्रमांचे लोकार्पण मुकुल माधव फाउंडेशनतर्फे करण्यात आले.

पिराची कुरोळी, लोणी काळभोर आणि वाखरी (पंढरपूर) येथे वारकऱ्यांच्या निवाऱ्यासाठी उभारण्यात आलेल्या या शेड्सचे उद्घाटन निवासी जिल्हाधिकारी अजित देशमुख यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. या वेळी प्रांताधिकारी सचिन ढोले, गटविकास अधिकारी, तहसीलदार, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, यांच्यासह फिनोलेक्सचे उपाध्यक्ष बी. आर. मेहता, नितीन कुलकर्णी व मुकुल माधव फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. लोणी काळभोर येथील शेडचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे उपमुख्याधिकारी संदीप कोहिनकर यांच्या हस्ते झाले. या शेड्समुळे वारकऱ्यांना रात्रीच्या वेळी झोपण्याची सोय होणार आहे. वारीनंतर या शेड्सचा उपयोग गावकऱ्यांना वर्षभर त्यांच्या कार्यक्रमासाठी करता येणार आहे. संबंधित ग्रामपंचायतीकडून त्याची देखभाल केली जाणार आहे.

### जलसंधारण कार्य ते विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदत

- मुकुल माधव फाउंडेशनने सोलापूर येथील माधव वेल्फेअर फाउंडेशनच्या सहकार्याने २०१८ मध्ये जलसंधारण प्रकल्प सुरु केला होता. त्या प्रकल्पाचा लाभ माढा तालुक्यातील ३२ गावांना होणार आहे.
- सोलापूरमधील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या ९ वी आणि १० वीतील शंभर विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले.
- या उपक्रमामुळे पालकांकडून आपल्या मुलींना शाळेत जाण्यासाठी प्रोत्साहन मिळत आहे. पुण्यातल्या वडगाव आनंद येथील विद्यार्थ्यांना जेवण्यासाठी स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी पक्के शेड उभारले आहे. रुग्णांसाठी केईएम रुग्णालयात मासिक मधुमेह तपासणी शिबिराचे आयोजन केले. त्यात २६ रुग्णांवर उपचार करण्यात आले.